# प्रेसनोट

## जन जागरूकता अभियानाअंतर्गत शहरातील मुख्य चौकात म्युजिकल झिंगल्सचा शुभारंभ
## —०भंडारा जिल्हा पोलीस व मिशन संभव चा संयुक्त उपक्रम ०—

**भंडारा** :— जन सुरक्षा व जागरूकता अभियानांतर्गत शहरातील समाजसेवी संस्था आयडीयल पब्लिक सेफ्टी आणि वेलफेअर सोसायटी यांनी भंडारा जिल्हा वाहतूक पोलीसांच्या सहकार्याने जनतेच्या सुरक्षेच्या दृष्टीकोणातून वाहतूकीसंबंधाने महत्त्वाची माहिती जनतेपर्यंत पोहचावी म्हणुन आज दि. ०३/०१/२०१७ पासून शहरातील कलेक्टर चौक, बस स्थानक चौक व पोस्ट ऑफिस चौक अशा मुख्य चौकामध्ये जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीमती विनिता साहू यांचे हस्ते आयोजित कार्यक्रमात म्युजिकल झिंगल्सचा शुभारंभ केला.

यावेळी सोसायटी व्दारा या अभियानाला ३ वर्षापासून वगेवेगळया शहरामध्ये मिशन संभव या नावाने चालविल्या जात आहे. ज्याला आज प्रथम महाराष्ट्र राज्याच्या भंडारा जिल्हयापासून सुरूवात करण्यात आली. या जनहित संदेशातून जनतेची सुरक्षा,स्वच्छता ,पर्यावरण,भृणहत्या, भ्रष्टाचार, जनसंख्या , जलसंरक्षण, वीज व पाण्याची बचत यासारख्या महत्त्वाच्या संदेशाचा यातून प्रचार केला जात आहे. हया संस्थेचे संस्थापक श्री. संदिप धुप्पड यांनी सांगीतले कि, शहराच्या चौका चौकात या संस्थेव्दारे मधुर संगीत तथा कर्णमधुर संगीताची व्यवस्था करण्यात आलेली आहे. ज्यामुळे चौकाचौकातील ध्वनीप्रदुषण कमी होईल तसेच त्या त्या ठिकाणचे थांबलेले आणि हळुवारपणे चाललेल्या वाहनचालकाचे मानसिक तनाव कमी होवू शकेल. जरी चौकात उभे राहावे लागले, तरी अश्यावेळीसुध्दा चालकाची वेळ हि चांगल्या प्रकारे जावू शकेल. हया संगीता सोबत आमचे सोसायटीने लोकांकरीता तसेच वाहतुकीच्या दृष्टीने म्युझिकल झिगंल्स व्दारे सर्वसामान्य लोकांचे जनजागरण करता येईल. जी लोकांच्या दैनिक जिवनाशी संबंधीत राहील आणि लोकांना चांगल्या गोष्टीचा लाभ मिळून एक स्वच्छ समाजा तयार होईल. भंडारा शहरामध्ये सदर योजनेची सुरूवात करण्याकरीता भंडारा पोलीस विभाग, नगरपरिषद यांचा विशेष सहयोग लाभलेला आहे. सदर कार्यक्रमात सोसायटीचे संस्थापक श्री. संदिप धुप्पड आणि महाराष्ट्र प्रदेशचे अध्यक्ष श्री. जलद शर्मा आणि समीतीचे सदस्य इत्यादी उपस्थित होते. सदर योजनेला यशस्वी करण्याकरीता क्रिएटीव्ह गृप व ग्रीन मांईड सस्थाचे संचालक श्रीमती स्मिता गालफाडे व श्रीमती संध्या किरोलीकर यांचा सहयोग प्राप्त झाला. तसेच अपर पोलीस अधीक्षक श्रीमती रश्मि नांदेडकर, नगर परिषद मुख्यधिकारी श्री. अडगाळे, उपप्रादेशीक परिवहन अधिकारी, भंडारा, प्र. पोलीस उपअधिक्षक(गृह) श्री. गाडे, पोनि चव्हाण पो.स्टे. भंडारा, पोनि राऊत, वाहतुक नियत्रंण शाखा, भंडारा, जेसीस हायस्कुल, भंडारा येथील विद्यार्थी व विद्यार्थीनी, पोलीस विभागातील पोलीस अधिकारी व कर्मचारी, कार्यालयीन मंत्रालयीन कर्मचारी हे सर्व उपस्थित होते. या सर्वांचा समितीने आभार व्यक्त केला .

(बी.आर.गाडे)
प्र.पोलीस उपअधिक्षक(गृह),
भंडारा.